# राष्ट्रीय सेवा योजना

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

# विशेष शिबीर अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१८–२०१९

१.महाविद्यालयाचे नाव – मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड,पुणे–३८.

२.प्राचार्य नाव – प्राचार्य डॉ. सुषमा जयंत भोसले

३.कार्यक्रम अधिका–यांचे नाव –

१.प्रा.लक्ष्मण उकिर्डे – ९८८१७६७९५७

२.डॉ.भरत राठोड – ८८८८७९६३५४

३.डॉ.निता कांबळे – ९६८९७५८७१२

४.स्वयंसेवकांची संख्या (एकक) – २५० (अक्षरी दोनशे पन्नास)

५.कार्यशाळा /शिबिर/व्याख्याने इत्यादी –

६.विशेष शिबिराचे ठिकाण – मु.पो.दखणे, ता.मुळशी, जि.पुणे.

७.विशेष शिबिरात सहभागी स्वयंसेवक –१२५ – २२ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०१८

## विशेष शिबीर अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या १५०व्या जयंती निमित्त शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकासाचे समर्थ भारत अभियान आणि स्वामी विवेकानंद यांच्या शिकागोतील भाषणास १२५ वर्षे पूर्तीनिमित्त सक्षम युवा समर्थ भारत या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ शनिवार दि.२२ डिसेंबर २०१८ रोजी सरपंच सौ.ज्योती राजीव दाभाडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्यांनी

गाव शिवाराची ओळख करून दिली, तसेच गावात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती दिली व शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुषमा भोसले यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले व शाश्वत स्वरूपाचे काम करावे व त्यातूनच आपले व्यक्तिमत्व घडवावे असे स्पष्ट केले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उपसरपंच श्री.सुनिल दाभाडे, श्री.राजकुमार शिंदे (ग्रामसेवक) श्री.राजेश वायकर (पोलिस पाटील) व श्री.राजीव दाभाडे व श्री.मयूर दाभाडे (सामाजिक कार्यकर्ते) व समस्त ग्रामस्थ व माजी सरपंच व पदाधिकारी उपस्थित होते.

या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.उकिर्डे लक्ष्मण यांनी केले. सूत्र संचालन डॉ. निता कांबळे यांनी केले व आभार – प्रा.डॉ.भरत राठोड यांनी केले.

शिबीर कालावधीत रविवार दि.२३ डिसेंबर २०१८ रोजी जल व्यवस्थापन या विषयावर श्री.प्रदीप पाटील यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. जल व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. जलसंवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी काम करावे असे त्यांनी सांगितले.

तसेच महाविद्यालयातील अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभागाच्यावतीने गावचे सामाजिक, राजकीय,आर्थिक सर्वेक्षण विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आले. यामध्ये अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अपेक्षा जाधव व राज्यशास्त्र प्रमुख डॉ.भरत राठोड यांनी सहभाग घेतला.

सोमवार दि.२४ डिसेंबर २०१८ रोजी श्री.रमेश विटकर यांनी विषारी सर्प समज–गैरसमज या विषयावर विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जैव विविधतेबद्दल जागृती निर्माण झाली. महाविद्यालयातील जीवशास्त्र विभागाच्या वतीने प्रा.प्रिया अरडे यांनी गावाच्या परिसरातील जैव विविधतेबद्दल माहिती गोळा केली. तसेच रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. वडेर जी.बी.यांनी गावातील उपलब्ध पाण्याच्या स्त्रोतांचे नमुने घेउन परीक्षण केले. व भौगोलिक सर्वेक्षणाचे काम डॉ.शिंदे शिवाजी यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने केले.

मंगळवार दि.२५ डिसेंबर २०१८ रोजी श्री संदिप बर्वे यांचे **गांधीजींच्या स्वप्नातील भारत** या विषयावर मार्गदर्शन केले व खेडयाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही असे विचार व्यक्त करून खेडी सक्षम करण्याचे काम स्वयंसेवकांनी या शिबिराच्या माध्यमातून करावे असे विचार मांडले. तसेच महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने गाव परिसरातील व्यापार व औद्योगिक अभ्यास करण्यात आला. डॉ. निता कांबळे, डॉ.सुनिता डाकले, डॉ.प्रकाश हुंबाड यांनी सहभाग घेतला.

तसेच **जीवन बिमा निगम** चे विकास ऑफीसर श्री.ऋषीकेश शेडगे व श्री. शिवाजी सर्जेराव यांनी विमा क्षेत्र व त्यातील नोकरीची संधी या बाबत सखोल मार्गदर्शन केले.

बुधवार दि.२६ डिसेंबर २०१८ रोजी– फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, वेदभवन, पुणे यांच्या वतीने दखणे गावातील महिलांसाठी आरोग्यजागृती या विषयावर कार्यशाळेचे

MAMASAHEB MOHOL COLLEGE ★ PAUD ROAD, PUNE-38 ★ PDEA

आयोजित करण्यात आले. त्यामध्ये गावातील ८० महिलांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संयोजन सरपंच ज्योती दाभाडे व स्वंयसेविकांनी केले.

तसेच महाविद्यालयातील डॉ.विजय बालघरे (मराठी विभाग ) डॉ. श्रीनिवार इपलपल्ली (इंग्रजी विभाग ), डॉ.सकट हिमालय (हिंदी विभाग )यांनी गावाचा इतिहास लेखन व भाषिक सर्वेक्षण केले.

गुरूवार दि.२७ डिसेंबर २०१८ रोजी श्री.प्रविण निकम यांनी युवकांची सामाजिक जबाबदारी या विषयावर मार्गदर्शन केले व एन.एस.एस च्या माध्यमातून युवक हि जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडू शकतो, तसेच स्वामी विवेकानंद यांचे युवकांसाठीचे विचार मांडले.

तसेच गावाच्या परिसरात (शिवार फेरी ) फिरून विद्यार्थ्यांनी जैव विविधतेबद्द्ल माहिती घेतली. विविध वनस्पतींचा अभ्यास केला व औषधी वनस्पतीबद्द्ल माहिती मिळविली.

या शिबिर कालावधीत उर्जा बचत जागृती, ग्रामस्वच्छता, सांस्कृतिक कार्यक्रम व्यसनमुक्ती व आरोग्य, शासकीय विविध योजनांची ग्रामस्थांना माहिती दिली. प्लॅस्टिक वापराबद्दल प्रबोधन करण्यात आले. गावातील मंदिर परिसर, शाळा परिसर, सांडपाण्याची गटारे स्वच्छ करण्यात आली. तसेच पथनाटय व गीतांच्या माध्यमातून समर्थ भारत अभियान व सक्षम युवा समर्थ भारत उपक्रम या विषयी प्रबोधन करण्यात आले. महात्मा गांधी व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची माहिती व्हावी म्हणून गावातून स्वंयसेवकांनी पदयात्रा काढली. यामध्ये ग्रामस्थ सहभागी झाले होते.

विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.पाठक आदिनाथ यांनी गावातील मुलींसाठी कराटे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप कार्यक्रम शुक्रवार, दि.२८ डिसेंबर २०१८ रोजी करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श जिल्हा परिषद सदस्य श्री. सुभाषशेठ अमराळे उपस्थित होते. त्यांनी संस्थेचा गौरव करून एन.एस.एस चे स्वयंसेवक देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात नेहमीच सहभागी होतात असे गौरवोद्गार काढले व समाजाप्रती एकनिष्ठ राहण्याचे आहवान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुषमा भोसले यांनी स्वंयसेवकांनी शिबिरातील राबविलेल्या उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले व पुढील सलग दोन वर्ष याच गावात शिबिर घेउन गावाचा सर्वांगीण करण्यासाठी आपण कटिबध्द आहोत असे सुतोवाच केले. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सरपंच सौ.ज्योती दाभाडे, श्री.राजेश वायकर (पो. पाटील) व श्री.राजीव दाभाडे, श्री.मयुर दाभाडे यांनी आपले विचार व्यक्त केले. तसेच माजी विद्यार्थी संघाच्यावतीने शिबिरात उत्कृष्ठ काम करण्या–या स्वयंसेवकांना स्मृतीचिन्ह व पुस्तक प्रमुखपाहुणे श्री.सुभाषशेठ आमराळे यांच्या हस्ते देउन कौतुक करण्यात आले.

MAMASAHEB ... COLLEGE PAUD ROAD, PUNE PDEA

सदर शिबिराचे आयोजन संस्था पदाधिकारी व मा.प्राचार्य डॉ.सुषमा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.लक्ष्मण उर्किडे, डॉ.भरत राठोड, डॉ.निता कांबळे,प्रा.अशोक शेळके, प्रा.अनिता गाडेकर यांनी केले. शिबिरात एकूण १२५ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे ३८.

प्राचार्य
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
४८/१अ, एरंडवणा, पौड रोड, पुणे-३८

MAMASAHEB MOHOL COLLEGE * PAUD ROAD, PUNE-38 * PDEA